# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ARC/२०१५/160

दिनांक 6 JUL 2015

प्रति,

**प्राचार्य,**

व्यावसायिक अभ्यासक्रमाची सर्व अर्ज स्विकृती केन्द्रे,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत अर्ज स्विकृती केन्द्राकडे शुल्क स्वरुपात जमा होणा-या रकमांचा भरणा करणेबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१५/८९५ दिनांक २६ जून २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वतीने विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज स्विकृती केन्द्रांना मान्यता दिलेली आहे. अभ्यासक्रमांच्या प्रवेशच्या वेळापत्रकानुसार प्रवेशोच्छुक उमेदवारांकडून जमा होणारे शुल्क त्याच वेळी ॲक्सीस बँकेत जमा करण्याबाबतच्या सुचना सर्व अर्ज स्विकृती केन्द्रांना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळापत्रकाच्या शेवटच्या दिवशी जमा होणारी रक्कम काही अर्ज स्विकृती केन्द्रांना बँकेत जमा करता आलेली नाही व परिणामी या शुल्काचा भरणा करण्याबाबत विचारणा होत आहे. या अनुषंगाने कळविण्यात येते की, अर्ज स्विकृती केन्द्रांना त्यांचेकडे जमा होणारी रक्कम शक्यतो त्याच दिवशी ॲक्सीस बँकेत जमा करणे आवश्यक आहे मात्र अपवादात्मक परिस्थितीत शेवटच्या दिवशी जमा होणारी रक्कम बँकेत जमा करता आली नसेल तर अशा प्रसंगी ती रक्कम संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई यांचे नावे काढलेल्या धनाकर्षाव्दारे (डी.डी.) या कार्यालयाकडे अर्ज स्विकृतीची मुदत संपल्यानंतर त्वरीत जमा करण्यात यावी.

येथे नमूद करण्यात येते की, वरील प्रमाणे धनाकर्षाव्दारे रक्कम जमा करण्याची पध्दती अपवादात्मक परिस्थितीतच अमलात आणावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.